# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१६१४/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. जगदिश निळकंठ सोनवणे, रा. न्युज कार्यालय, रामदत्त हनुमान चौक, देसाईपुरा, नंदुरबार, ता.जि. नंदूरबार | प्रशासकीय अधिकारी, वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांचे कार्यालय, पोलीस प्रशिक्षण केंद्राजवळ, लेनिन चौक, धुळे, ता.जि. धुळे | विभागीय वन अधिकारी (नियोजन), वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांचे कार्यालय, पोलीस प्रशिक्षण केंद्राजवळ, लेनिन चौक, धुळे, ता.जि. धुळे |

**सुनावणी दिनांक – २१/०७/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित | अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १३/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागणी केलेली माहिती परिपूर्ण नसून अपूर्ण स्वरुपात मिळाली.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०/१२/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २३/१२/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २२ मार्च २०२१ ते २० डिसेंबर २०२१ पर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

श्री. जगदिश नीलकंठ सोनवणे यांचा तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २७/०९/२०२१ रोजी विभागीय वन अधिकारी (दक्षता), धुळे यांनी आपल्या कार्यालयात पत्र क्रमांक कक्ष-४/दक्षता/विवअ/२०-२१/४९०/२१-२२ नुसार चौकशी अहवाल सादर केला आहे. त्या संपूर्ण चौकशी अहवालाची माहिती छायांकित स्वरुपात मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांचे कार्यालय, धुळे, ता.जि. धुळे यांनी दि.१४/०१/२०२२ च्या पत्रान्वये उपलब्ध असलेली ०३ पानांची माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ३१/०१/२०२२

(२) प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३/०२/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : दिलेली माहिती अपूर्ण आहे.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांचे कार्यालय, धुळे, ता.जि. धुळे यांनी दि.२३/०३/२०२२ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-११/संकीर्ण/मा.अ.२००५/प्र.क्र.१५२/७५०/२०२१-२२ दिनांक १४/०१/२०२२ अन्वये अर्जदार यांना त्यांचे अर्जावर उपलब्ध माहिती ए-४ साईज पृष्ठ संख्या ०३ मात्र पुरविण्यात आली असल्यामूळे सदर अपील खारीज करण्यात आल्याचे दिसून येते.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी - तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांचे कार्यालय, धुळे, ता.जि. धुळे यांनी दि.१४/०१/२०२२ च्या पत्रान्वये उपलब्ध असलेली ०३ पानांची माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते.

**६. निष्कर्ष –**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांचे कार्यालय, धुळे, ता.जि. धुळे यांनी दि.१४/०१/२०२२ च्या पत्रान्वये उपलब्ध असलेली ०३ पानांची माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते.

२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांचे कार्यालय, धुळे, ता.जि. धुळे यांनी दि.२३/०३/२०२२ रोजी सुनावणी घेवून प्रथम अपील आदेश पारित केल्याचे दिसून येते.

३) अपीलार्थी यांनी माहिती अर्जातइ ज्या पत्राचा उल्लेख केला आहे त्याची प्रत आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत नाही.

४) अपीलार्थी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित असल्याने कोणती माहिती अपूर्ण मिळाली याचा बोध होवू शकला नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक १६१४/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. CCLY

दिनांक : 19 NOV 2025